# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०२/०९/२०२४ (सोमवार) सकाळ


---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ०१/०९/२०२४ रोजी चे ०७.०० वा. ते ०७.४५ वा. दरम्यान पो. स्टे. मौदा हद्दीत स्टाफसह अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना बोलेरो पिकअप क्र. एम.एच ४०/ सी डी ४९०६ मधून अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने मौजा वडोदा शिवार येथे नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप वाहनास थांबवून पाहणी केली असता एम.एच ४० सी डी ४९०६ मध्ये १३ गोवंशिय जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने चालक व वाहक यांना ताब्यात घेऊन त्यांचे ताब्यातून एम.एच ४० सी डी ४९०६ अं.कि. ५,००,०००/– रु मध्ये १३ गोवंशिय जनावरे किंमती प्रत्येकी कि. १०,०००/रु प्रमाणे १,३०,०००/रु असे एकुण ६,३०,०००/रु_चा माल जप्त करण्यात आला असून **एम.एच ४० सी डी ४९०६ चे चालक आरोपी नामे– १) सौरभ अरूण ढबाले वय २५ वर्ष रा. वडोदा ता. कामठी २) एम.एच ४० सी डी ४९०६ चे वाहक राकेश दिनेश आंबिलकर वय २२ वर्ष रा. बाजार वार्ड लाखनी जि. भंडारा** यांचे विरूद्ध कलम ११(१)(क), ११(१)(म), ११(१)(ḟ) प्रा.छ.प्र.अधि. सह कलम ५(अ)(१), ९ महा प्राणी सं. अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे, सहायक पोलीस निरीक्षक मनोज चौधरी, पोहवा प्रकाश गाठे, पोअं अतुल निंबार्ते, शुभम ईश्वरकर यांनी केलेली आहे.





## मेंढया चोरी करणारा आरोपी कळमेश्वर पोलीसांनी केले अटक

दिनांक ०१/०९/२०२४ रोजी मौजा निमजी खदान शिवार येथे फिर्यादी नामे— लाखा देवा रब्बारी वय ३५ वर्ष रा गुजरात गाव दुधई भुज. ह. मु वडधामना सरकारी टेकडी वाडी नागपुर हा आपल्या परीवारासह त्याचे पुर्वजा पासुन मेंढया पालनाचे काम करतो दि ०१/०९/२४ रोजी फिर्यादी आपले मेंढया ज्या ठिकाणी ठेवले होते दुपारी १२/०० वा चे दर त्या ठिकाणी काही लोक दिसले तसेच फिर्यादीने पोलीसांना माहीती दिली त्या ठीकाणी लपत छपत जावुन बेडयाजवळ फिर्यादी गेले असता काही लोक पळुन गेले व **एक इसम नामे— धनराज राजु गिरी रा. कोथुर्ना** हा घटनास्थळी मिळुन आला. त्याला कळमेश्वर पोलीसांच्या ताब्यात दिले. फिर्यादीच्या ०९ मेंढया किंमती ५४,०००/—रू. आरोपींनी चोरून नेल्या आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोनि मनोज काळबांडे, सफौ मनोज गाढवे, पोअं. जिवन वाघे यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**